दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१९ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 19 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 34 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# बळीराजा संकटात, ओला दुष्काळ जाहीर करावा-जयंत पाटलांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## या सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटत नाही?



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागांत पूरस्थिती निर्माण झाली असून शेतीचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. बळीराजा इतक्या अडचणीत असताना या सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटत नाही? असा सवाल त्यांनी पत्राद्वारे विचारला आहे.राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे लाखो शेतकरी बाधित झाले आहेत. शेती पिके, घरे, जनावरे आणि गोठे पाण्याखाली गेल्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी सरकारने त्वरित पावले उचलणे आवश्यक असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.जयंत पाटील यांनी सरकारकडे तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच, शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करून त्यांना संकटातून बाहेर काढण्यास मदत करावी, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांना तातडीने मदत पोहोचवणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यांत अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील तब्बल १७ लाख ८५ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. मुसळधार पावसामुळे नाल्याला पूर येऊन शेतीचे आणि ओढ्यालगत असलेल्या घरांचे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पुर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. पावसामुळे शेतातील माती वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडला आहे.अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ कार्यपद्धतीमुळे पंचनामे वेळेत होत नसून त्याची माहिती सर्व शेतकऱ्यांना दिली जात नाही. पंचनामे झाले तरी वास्तव नुकसानाचे योग्य मुल्यमापन होत नसल्याने शेतकऱ्यांच्या मनात तीव्र संताप निर्माण झाला आहे. पाऊस सर्वत्र पडलेला असल्यामुळे नुकसानही सर्वच शेतकऱ्यांचे झाले आहे. बँकांचे हप्ते कसे फेडायचे, मुलांचे शिक्षण कसे करायचे असे प्रश्न पिडीत शेतकरी करत आहेत, असे जयंत पाटील यांनी पत्रात म्हटले आहे.तसेच पीकविमा कंपन्यांवर दबाव आणून शेतकऱ्यांना तातडीने विमा दावे अदा करण्याचे आदेश द्यावेत. बँकाकडून होत असलेली वसुलीची कार्यवाही तात्काळ थांबवावी. शेतकऱ्यांसाठी अतिरीक्त बियाणे व खतांचा पुरवठा उपलब्ध करुन द्यावा असेही जयंत पाटील म्हणाले. सरकारने पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा थांबवावा आणि शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी. केवळ पीक नुकसान नव्हे तर जनावरांचे, घरांचे व गोठ्यांचे नुकसान यासाठीही मदत जाहीर केली जावी, अशी विनंती जयंत पाटील यांनी पत्रातून केली आहे.

# भारतीय बौद्ध महासभेचा जन अक्रोश मोर्चा धडकला उपजिल्हाधिकारी कार्यालयावर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा), समता सैनिक दल, बौद्ध भिक्खु संघ तसेच विविध आंबेडकरवादी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आज अंबाजोगाई येथे जन अक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आयु. भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या आदेशाने व जिल्हाध्यक्ष ॲड. बी. बी. धन्वे यांच्या नेतृत्वाखाली उप जिल्हाधिकारी कार्यालयावर सनदशीर मार्गाने नेण्यात आला.

या आंदोलनातून सरकारसमोर तीन ठोस मागण्या मांडण्यात आल्या त्यामध्ये बोधगया महाबोधी महाविहारचे संपूर्ण प्रबंधन अधिकार बौद्ध समाजाकडे द्यावेत. तसेच महू जन्मभूमी स्मारकाचे व्यवस्थापन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया कडे सोपवावे. व नागपूर दीक्षाभूमीवरील विद्रूपीकरण थांबवून प्रबंधन आंबेडकर परिवाराकडे द्यावे. शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडलेल्या या मोर्चातून आम्ही सजग आहोत आणि संघर्षासाठी सदैव तयार आहोत असा ठाम संदेश शासनाला देण्यात आला.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष ॲड. बी. बी. धन्वे, संस्कार उपाध्यक्ष एस. बी. मोरे, संस्कार सचिव एस. एन. वाघमारे, संरक्षण सचिव आर. डी. जोगदंड, केज शहराध्यक्ष जे. आर. मस्के, माजी तालुकाध्यक्ष एन. बी. मस्के, व्यंकट वेडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व बौद्ध समाज उपस्थित होता.

# उसने दिलेले पैसे परत का मागतोस? म्हणून केला सत्तूरने वार !

**केज । गौतम बचुटे**


उसने दिलेले पैसे परत मागण्याच्या कारणा वरून पाठलाग करून एकला सतूरने वार करून मारहाण केल्याची घटना घडली आहे. दि. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता सुमारास देवगाव ता. केज येथील सुनिल सुभाष मुंडे वय (२७ वर्ष) हे बरड फाटा येथून मोटार सायकल वरून घरी जात असताना दहिफळ वडमाऊली फाटा ते देवगाव रोडवर देवगावच्या शिवारात रामदास जगन्नाथ मुंडे, रामहारी सुंदर मुंडे, विष्णु ज्योतीराम मुंडे व अनोळखी अनोळखी चार जणांनी पाठलाग करून अडविले. रामदास जगन्नाथ मुंडे हा सुनील मुंडे याला म्हणाला की, गाडी थांबव तुला बोलायचे आहे. असे म्हणून सुनिल मुंडे यांनी गाडी रोडच्या बाजूला ऊभी केली; त्यावेळी रामदास जगन्नाथ मुंडे हा त्याला म्हणाला की, तू मला सारखे कशाचे पैसे मागतोस, असे म्हणून शिवीगाळ करू लागला. तेव्हा सुनिल त्याला म्हणाला की, माझे ऊसणे घेतलेले पैसे मला परत दिले नाहीस म्हणून मी तुला पैसे मागितले. असे म्हणताच तुझे कशाचे पैसे द्यायचे ? मला माहित नाही. असे म्हणून रामदास जगन्नाथ मुंडे याने सुनील मुंडे याला शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण करून मुक्कामार दिला आणि हातातील सत्तूरने सुनील मुंडे याच्या डोक्यात वार केला; मात्र सुनीलने उजवा हात आडवा लावला त्यामुळे वार चुकून डोक्यात किरकोळ दुखापत झाली. तसेच हाताला अंगठ्याला मुक्कामार लागला.

त्या नंतर त्यांनी सुनील मुंडे यास त्याने पुन्हा जर पैसे मागितलेस तर जिवंत सोडणार नाही. अशी धमकी दिली.

सुनील मुंडे यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात रामदास जगन्नाथ मुंडे, रामहारी सुंदर मुंडे, विष्णु ज्योतीराम मुंडे आणि तीन अनोळखी इसम यांच्या विरुद्ध गु. र. नं. ५०५/२०२५ भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२, १८९(२), १९०, १९१(२) आणि शस्त्र नियम ४ व २५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल उमेश आघाव हे तपास करीत आहेत.

# साळेगाव येथे राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी



**केज । गौतम बचुटे**

केज ते कळंब जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर साळेगाव येथे जनावरांच्या आठवडी बाजारामुळे दोन तासा पासून वाहतूक कोंडी झालेली आहे.मागील काही महिन्या पासून पाऊस, शेतीची कामे, सण उत्सव आणि मुख्य म्हणजे जनावरांच्या खरेदी-विक्रीवर कुरेशी समाजाने टाकलेला बहिष्कार; यामुळे जनावरांच्या खरेदी-विक्रीवर मंदीचे सावट होते. आता वातावरण निवळले असल्याने दर गुरुवारी भरणाऱ्या साळेगाव ता. केज येथील आठवडी बाजारात सकाळी ६:०० वाजल्या पासून जनावरांची प्रचंड प्रमाणात आवक वाढलेली आहे. तसेच वाहनांची वर्दळ वाढल्याने बाजार तळाकडे जाणारे जनावरे, वाहने यांच्या गर्दीमुळे केज-कळंब जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-सी वर आणि बाजार तळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, मांगवडगाव कडून येणाऱ्या या चारही रस्त्यावर सुमारे अर्धा किमी अंतरावर वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्या असल्याने वाहतूक कोंडी निर्माण झालेली आहे.दरम्यान पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्याद्वारे वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच ग्रामस्थ देखील वाहतूक सुरळीत होण्यासाठी बाजारकरी आणि वाहनचालकांना मदत करीत आहेत.

# घरात दसऱ्याचा झाला शिमगा!

## बायकोशी पंगा महागात पडला ;मेव्हण्याने भावजी धरून आपटला तर सून चावली सासूला

**केज । गौतम बचुटे**

घरातील दसरा काढण्या वरून नवरा बायकोत भांडण झालं. अन् त्याची वार्ता सासुरवाडीत पोहोचतच सासरे आणि मेव्ह्यासह त्यांनी जावयाला मारहाण करून उचलून आपटला तर या भांडणात सुनबाई सुद्धा मागे राहिली नाही तिने सुद्धा सासूला कडकडून चावा घेतला. तसेच पती-पत्नीच्या आई-वडिलांत देखील मारामारी झाली आहे.दसरा म्हटले की, घरातील साफसफाई, धुणीभांडी व स्वच्छता करण्याचे काम सुरू होते. यात जास्त करून महिला मंडळींना अधिक ताण पडतो तर पुरुष मंडळी देखील मदत करतात.

दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ९:३० वा.च्या सुमारास केज तालुक्यातील शिरपुरा येथे घरातील दसरा काढण्या वरून अशोक बळीराम घुले व त्याची पत्नी जयश्री यांच्यात भांडण झाले. नवरा बायकोच्या भांडणाची माहिती जयश्रीचे माहेर डोणगाव ता. केज येथे माहिती झाल्या नंतर दि. १४ सप्टेंबर रोजी अशोक घुलेचे सासू-सासरे आणि मेव्हणा हे शिरपूरा येथे आले. त्यांनी अशोक घुले यास भांडणाचा जाब विचारला आणि मेव्हणा कृष्णा चौरे याने अशोक घुले यांच्या गच्चीला धरुन डोक्यावर आपटल्याने त्याचे डोके फुटले. सासरा देविदास चौरे याने अशोकचे वडील बळीराम घुले यांच्या डोक्यात व पाठीवर काठीने मारुन दुखापत केली. तसेच सासू



उर्मिला चौरे हिने अशोकच्या आईला केसाला धरून चापटा-बुक्यांनी व लाथा-बुक्क्याने मारहाण केली. अशोकची पत्नी जयश्रीने तिच्या सासूच्या उजव्या हातावर चावा घेतला. त्या सर्वांनी अशोक घुले व त्याच्या आई-वडिलांना मारहाण करून आमच्या मुलीला नीट नांदवा; नाही तर सर्वांना ठार मारण्याच्या धमक्या दिल्या.या प्रकरणी अशोक घुले याच्या तक्रारी वरून कृष्णा देविदास चौरे, देविदास सत्यभान चौरे, उर्मीला देविदास चौरे या मेव्हणा, सासरा आणि सासूसह पत्नी जयश्री अशोक घुले यांच्या विरुद्ध गु. र. नं. ५०१/२०२५ भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२(१), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पोलिस जमादार प्रल्हाद चव्हाण करीत आहेत.

# मोबाईल टॉवर दुरुस्तीला पदाधिकाऱ्यांची धावपळ, पावसातही सेवा पूर्ववत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसाने नगर जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले. रस्त्यांवर पाणी साचले, विजेचे खांब कोसळले, शेतीचे मोठे नुकसान झाले. याचबरोबर अनेक भागांतील मोबाईल टॉवरमध्ये बिघाड झाल्याने दूरसंचार सेवा ठप्प झाली होती. अचानक खंडित झालेल्या या सेवेमुळे नागरिकांचा एकमेकांशी संपर्क तुटून, अडचणींना सामोरे जावे लागले.

अशा वेळी महाराष्ट्र मोबाईल टॉवर तांत्रिक कामगार संघटनेने तातडीने पुढाकार घेत युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी शिंदे यांच्या आदेशानुसार नगर जिल्ह्यातील पाथर्डी, शेवगाव, कर्जत, जामखेड आदी ठिकाणी संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी थेट घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये युनियनचे सचिव उमाकांत सोनवणे, राहुल पुंड, जिल्हाध्यक्ष रफिक शहा, सुनील महाजन, भरत झेंडे, प्रसाद तरवडे, गणेश वाघ, विजय भापकर, उद्धव काळदाते, सिद्धार्थ थोरात, विजय जराड, सचिन पवार, हरीभाऊ लोखंडे, प्रवीण बडे, योगेश साबळे या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. पाण्यात बुडालेल्या टॉवरसमोरही हार न मानता त्यांनी प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम हाती घेतले.

अनेक टॉवर अजूनही पाण्यात असले तरी अथक परिश्रम घेऊन काही तासांत सेवा पूर्ववत करण्यात आली. या कामगिरीमुळे दूरसंचार सेवा पुन्हा सुरू झाली असून, नागरिकांना दिलासा मिळाला. विशेष म्हणजे पावसाच्या प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा कर्मचाऱ्यांनी धोक्याची पर्वा न करता तत्परतेने सेवा दिली.



संपादकीय

# प्रश्नांचा फास



थोडसं अनुकूल वातावरण मिळालं, की जुनी दुखणी लगेच उसळी मारतात. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचंही तसंच झालं आहे. गेल्या २५–३० वर्षांपासून छळणाऱ्या या दुखण्याकडे सुरुवातीपासूनच तात्कालिक दुखणं म्हणून पाहिलं गेलं. झटपट बरं करणारे उपाय त्यासाठी केले गेले. केंद्र आणि राज्य सरकारने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी मदतीची पॅकेज जाहीर केली. गेल्या २५ वर्षांत कमीअधिक परिणामकारक अशा वेगवेगळ्या कर्जमाफीही दिल्या गेल्या. पण, त्याने प्रश्न मिटला नाही. मिटणारही नाही. तात्पुरत्या मलमपट्ट्यांनी रुग्ण आणि डॉक्टर अशा दोघाचंही समाधान होईल कदाचित. पण, त्याने दुखणं बरं होणार नाही; रुग्ण आजारातून बाहेर येणार नाही. वेदना कमी व्हाव्यात यासाठी जसा बधिरीकरणाचा उपचार केला जातो आणि त्यातून रुग्णाला दुखणं बरं झाल्याचा भास होतो, तसं आजवरच्या उपाययोजनांचं झालं आहे. आत्महत्यांच्या संख्या त्यामुळेच अचानक वाढतात आणि वातावरणात अस्वस्थता पसरते. राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात सरकारकडून या संदर्भातली जी आकडेवारी मांडली गेली, त्यामुळे या दुखण्याकडे पुन्हा एकदा सगळ्यांचं लक्ष गेलं. या वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचं विधिमंडळाच्या सभागृहात सांगितलं गेलं. म्हणजे, दर तीन तासामागे एका शेतकऱ्याची आत्महत्या होत होती!! यावर्षीच्या आत्महत्यांत सर्वाधिक आत्महत्या विदर्भातल्या असून त्यातही यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांतील आत्महत्यांचं प्रमाण सर्वाधिक आहे. आत्महत्यांपैकी २५७, म्हणजे सुमारे ३३% आत्महत्या या पाच जिल्ह्यांतच झाल्या आहेत. मराठवाड्यात याच काळात १९२ आत्महत्या झाल्या असून त्यानंतरच्या तीन महिन्यांत, जून अखेरीपर्यंत आणखी ५५ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. १९९५ नंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या अनेक योजना राबवल्या गेल्या. देशभर राबवली जात असलेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, पीक विमा योजना, सवलतीच्या दरात खतं–बियाणं देऊनही या दुखण्याला उतार पडायला तयार नाही. उलट, ते अधिकाधिक गंभीर होत असून त्याचा रोष आता मोर्चे–आंदोलनांतून बाहेर पडू लागला आहे.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे महाराष्ट्रातील प्रदेश आणि संख्या यात गेल्या अनेक वर्षांत फारसा फरक पडला नसला, तरी त्याची कारणं मात्र वेगवेगळी आहेत. अनेक वेळा तर ती परस्परविरोधी पाहायला मिळतात. त्यामुळे, या दुखण्याला एकच एक उपाय नाही. पण, सर्व आत्महत्यांची कारणं पाहून त्यावर उपाययोजना करण्यासाठी व्यापक आराखडा तयार केला आणि त्यातील उपायांची प्रदेशनिहाय प्राधान्याने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित त्याचे सकारात्मक परिणाम मिळतीलही. सरकारने वेळोवेळी अनेक उपाययोजना लागू केल्या. त्याची यशस्वी अंमलबजावणी झाल्याचे अहवाल सरकारदप्तरी जमा आहेत. तरीही आत्महत्या थांबत नसतील, तर औषधातच काहीतरी गडबड आहे, त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही हे सरकारने स्वीकारण्याची गरज आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या परीने या प्रश्नाला भिडायचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्याने; घरातल्या कर्त्या पुरुषाने आत्महत्या केल्यानंतर मागे राहिलेल्या त्याच्या पत्नीला, मुलाबाळांना धीर देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाय करण्याचा प्रयत्न या संस्थांकडून सुरू आहे. त्याला यशही येत आहे. पण, स्वयंसेवी संस्थांचे हे प्रयत्न एकूण गरज पाहता तोकडे पडताहेत. दुर्घटना घडल्यानंतर उर्वरित कुटुंबीयांची काळजी घेण्याची गरज असतेच; पण त्याहीपेक्षा दुर्घटना घडणारच नाही यासाठी दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे. अशी उपाययोजना केवळ सरकारच करू शकतं. केंद्र आणि राज्यातील सरकारांनी केवळ या एकाच प्रश्नासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करून, त्यात तज्ज्ञांचा समावेश करून महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखायला हवा. शेतकऱ्याला दोरीच्या फासापर्यंत जावंच लागणार नाही, अशी परिस्थिती निर्माण व्हायला हवी.खरंतर, हे सगळ्यांनाच मान्य आहे. याबाबत कोणाचंच दुमत नाही. पण, तरीही जे प्रयत्न व्हायला हवेत, ते होताना दिसत नाहीत. उलट, या आत्महत्यांबद्दल संशय निर्माण करणाऱ्या कथा चर्चिल्या जातात हे दुर्दैव आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, शेतमालाला रास्त भाव न मिळणं, शेतमालाचा बहुतांश असंघटित बाजार – यानंतर आता वातावरणीय बदलाचाही समावेश या संकटांमध्ये होतो आहे. अन्य सामाजिक, सांस्कृतिक कारणं त्यानंतर आहेतच. यातल्या कोणत्या प्रश्नांना सरकारकडे उत्तर असेल आणि कोणते प्रश्न स्वयंसेवी संस्थांच्या हाती सोपवायचे याचा विचार करून दोन्ही पातळ्यांवर त्यासाठी काम करावं लागेल. महाराष्ट्रात आरक्षणासाठी जसं मराठ्यांचं आंदोलन सुरू आहे, तसंच अन्य राज्यात तिथले धारक; शेतकरी समाजही याच कारणासाठी रस्त्यावर आले आहेत. आपल्या दु:स्थितीला आरक्षण हे उत्तर नाही, हे त्यांनाही माहीत आहे. पण, जखमेवर फुंकर घालणं ही त्यांची गरज आहे. शेतीच्या प्रश्नाकडे प्राधान्याने, गांभीर्याने पाहिल्याखेरीज, मक्तेदारी अर्थव्यवस्थेकडे चाललेली वाटचाल बदलल्याखेरीज फासाला लटकावून घेणाऱ्या बळीराजाला दिलासा मिळणार नाही. शेतीसंबंधी असा मूलभूत विचार केला नाही, तर आत्महत्यांची संख्या आणि त्यातून असंतोष वाढतच जाईल. त्यातला धोका सगळेच जाणतात.

# पनवेल तालुक्यात प्रथमच श्रीमद भगवद गीता पठण स्पर्धा

**पनवेल । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्री गुरुकुलम न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमद भगवद गीता पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आज (दि. १७) येथे आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. विशेष म्हणजे प्रथमच अशा स्पर्धेचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले असून अभिनव उपक्रम असलेल्या या स्पर्धेत हजारोंच्या संख्येने नागरिक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी यावेळी केले.

पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, गुरुकुलम न्यास अध्यक्ष मंजिरी फडके, संस्कार भारतीच्या जुईली चव्हाण, संस्कृत भारतीच्या अनया करंदीकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, श्यामनाथ पुंडे, अमोल खेर, चिन्मय समेळ, गणेश जगताप आदी उपस्थित होते.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल यांच्या वतीने श्रीगुरुकुलम् न्यासतर्फे आज सकाळी श्री. विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे श्रीमद् भगवद् गीता पाठ महायज्ञ संपन्न झाले. तसेच एकाच वेळी २०० हुन अधिक जणांनी एकत्र येऊन श्रीमत भगवद गीतेतील सर्व श्लोकांचे लयबद्ध पठण करून गीतेच्या ज्ञानाचा दिव्य अनुभव घेतला. या संस्कारमय कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्रीमद भगवद गीता पठण स्पर्धेची घोषणा पत्रकार




परिषदेच्या माध्यमातून करण्यात आली.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी या स्पर्धेविषयी माहिती देताना पुढे सांगण्यात आले कि, ही स्पर्धा पनवेल तालुक्यात मर्यादित असून प्रवेश विनामूल्य असेल. शालेय गट आणि खुला गट अशा दोन गटात स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धक हा पनवेल तालुक्याचा रहिवासी अथवा तालुक्यातील शाळेचा विद्यार्थी असणे आवश्यक आहे. स्पर्धा प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा टप्प्यांत घेण्यात येणार असून अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १५ ऑक्टोबर २०२५ आहे. अर्ज गुगल फॉर्म किंवा क्यू आर कोडद्वारे सादर करावा. प्राथमिक फेरी पनवेल शहर, नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, नेरे आणि उलवे येथे होणार असून सहभागी स्पर्धकांना त्यांच्यासाठीचे स्पर्धा केंद्र १५ ऑक्टोबरनंतर जाहीर केले जातील. त्यानंतर अंतिम फेरी १३ व १४ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. शालेय गट इयत्ता ३ री व ४थी साठी अध्याय १२ (भक्ती योग) श्लोक १ ते १०, इयत्ता ५वी ते ७ वी करिता अध्याय १२ (भक्ती योग) संपूर्ण, तर इयत्ता ८ वी ते १०वी साठी अध्याय १५ (पुरुषोत्तम योग) संपूर्ण असे विषय आहेत. तर खुला गटासाठी संपूर्ण श्रीमद भगवद गीता मधील कोणताही श्लोक विचारण्यात येईल. खुला गटातील प्रथम क्रमांकास २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला १८ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, तर शालेय गटातील इयत्ता ३ री व ४थी मधील प्रथम क्रमांकास ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये तर तृतीय क्रमांकास २ हजार रुपये, इयत्ता ५वी ते ७वी मधील प्रथम क्रमांक ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ८ हजार तर तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये तसेच इयत्ता ८वी ते १०वी मधील प्रथम क्रमांकास १५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ११ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाला ८ हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप आहे. त्याचबरोबर प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल, तसेच विजेत्याला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार स्पर्धकांच्या सोयीसाठी संबंधित अध्यायांचे ऑडिओ व पीडीएफ मागणीनुसार उपलब्ध करून दिले जातील, असेही या पत्रकार परिषदेत माहिती देताना नमूद करण्यात आले.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अथक परिश्रम घेतले असून सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास या ध्येयवाक्याने भारताच्या प्रगतीला वेग दिला आहे. देशहितासाठी त्यांनी दिलेले नेतृत्व आणि केलेली कार्ये ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे.जागतिक स्तरावर भारताची छाप पाडण्यात त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, प्रामाणिक परिश्रम, समाजकल्याणाची बांधिलकी आणि राष्ट्रहितासाठीचे समर्पण यामुळे भारत आज नव्या उंचीवर पोहोचला आहे.आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे कार्य महान असून त्यांच्या कार्याची उंची खूप मोठी आहे. सतत देशाच्या विकासाचा ध्यास घेऊन ते देशासाठी अहोरात्र काम करत असतात. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत असताना दीर्घायुष्य लाभो हि सर्वांच्या वतीने सदिच्छा व्यक्त करतो. संस्कृत भाषा ज्ञानाची आणि संस्कृतीची आहे. आपल्या देशातील भाषा आणि साहित्य देशाचे वैभव आहे, त्या अनुषंगाने आपली संस्कृती वृद्धिंगत होत राहणे हि आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संस्कृत भाषेविषयी आवड निर्माण व्हावी यासाठी श्रीमद भगवद गीता पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून हा प्रयत्न कायम असणार आहे.

# महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा:शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, विजय वडेट्टीवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने तब्बल ३० जिल्ह्यांत नुकसान झाले आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर इतके क्षेत्र या पावसाने बाधित झाले आहे. आधीच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही त्यात शेतातील पीक देखील हातातून गेले आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकारने तातडीने मदत करावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.राज्यात मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे.सोयाबीन, मका, कापूस या पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. तसेच बँकेकडून शेतकऱ्यांची होणारी वसुली थांबवावी, पिक विमा कंपन्यांनी तातडीने शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी आपल्या पत्रात केली आहे.मंत्रिमंडळाच्या बैठकीकडे बळीराजा आस लावून बसला होता की त्याला काही मदत मिळेल पण या बैठकीत देखील शेतकऱ्यांसाठी काही निर्णय झाला नाही.शेतकरी निराश झाला आहे. त्यांना तातडीने मदतीची गरज आहे. राज्यातील पंचनामे लवकर पूर्ण करून ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदतीची घोषणा करावी अस वडेट्टीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.



# शिवकालीन रणरागिणींच्या स्मृती जागवणारा प्रेरणादायी सोहळा

## रवींद्र मालुसरे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील रणरागिणींचा पराक्रम आणि स्त्रीशक्तीची परंपरा नव्या पिढीपुढे उभी करण्यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादरच्या श्री शिवाजी मंदिर नाट्यमंदिरात वार्षिक सोहळा शेकडो विद्यार्थी, पालक आणि शिवप्रेमींच्या उपस्थितीने उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना आनंद दिला.सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक–लेखक प्रवीण भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, शिक्षणाचा उपयोग केवळ प्रमाणपत्रापुरता न राहता दैनंदिन आयुष्यात आणि आवडीच्या क्षेत्रात कर्तबगारी दाखवण्यासाठी करावा.वैयक्तिक आयुष्यात शिक्षणाची पात्रता सिद्ध करायला लागते. आज तुमचा शिक्षणाचा टप्पा पूर्ण झाला आहे, घेतलेल्या शिक्षणाचा रोजच्या व्यवहारात वापर कसा करणार आहात, हे जसे खरे आहे तसेच तुम्हाला इतर ज्या क्षेत्रात आवड आहे त्यात तुमचे अंगीकृत गुण दाखवत यशस्वी जीवनाला सामोरे जावे लागणार आहे. शिवरायांचे आठवावे रूप, आठवावा प्रताप – असे म्हणताना इतिहासाच्या पानांवर कोरलेल्या रणरागिणी डोळ्यासमोर येतात. मातोश्री जिजाबाई, महाराणी येसूबाई, ताराराणी, यलम्मा, पुण्यश्लोक अहिल्याबाई, विरांगणा रायबागन या स्त्रिया भावनांवर विजय मिळवत प्रत्येक आव्हानाला सामोरे जात होत्या. त्या स्वराज्यसेवक वीरांचा आधार होत्या आणि अप्रत्यक्षपणे स्वराज्यासाठी लढत होत्या. आजही स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. तुम्हीही त्यांचा आदर्श घ्यावा.विशेष पाहुणे म्हणून उपस्थित एनएसजी कमांडो नरेश पवार यांनी आपल्या लष्करी अनुभवांची माहिती दिली. ते म्हणाले, पठाणकोट हल्ला, जम्मू–काश्मीरमधील कारवाया, पुंछ येथे बॉर्डरपार ऑपरेशन – सलग तीन वर्षे पाकिस्तानविरोधात कार्य करताना आम्ही अनेक संकटांना सामोरे गेलो. नुकतेच यशस्वी झालेले सिंदूर ऑपरेशन जाहीर करणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन धाडसी महिला होत्या. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग सैन्यदलासाठीही करता येतो, प्राधान्याने देशसेवा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत समाजकार्याचा पाया ठरावेत, या ध्येयाने कार्य करणाऱ्यांना दिला जाणारा सुभेदार वीर तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार २०२५ मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष आणि इतिहास अभ्यासक रवींद्र मालुसरे यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, स्वराज्य हे शहाजी राजे आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे स्वप्न होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी ते सत्यात उतरवले, संभाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. या यज्ञात असंख्य मावळ्यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्र धर्म काय असतो हे जगाला कळाले. या इतिहासाचा विसर मराठी माणसाला पडता कामा नये. मालुसरे कुळात जन्म झाल्याने सुभेदारांचा इतिहास पुढे आणणे हे मी कर्तव्य समजतो आहे. संस्थेचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी संस्थेचे योगदान अधोरेखित केले. ते म्हणाले, बारावीनंतर मुलींनी स्वावलंबी व्हावे, ही संकल्पना घेऊन मी डॉ. गायकवाड इन्स्टिट्यूट सुरू केले. आज ते पॅरामेडिकल क्षेत्रात देशभरात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. होमगार्ड प्रमुख म्हणूनही काम केल्यामुळे त्या कठोर शिस्तीमुळे अनेक मुली माझ्यावर बापासारखा विश्वास ठेवतात. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य देशातील विविध भाषांमध्ये पोहोचवण्यासाठी त्यांनी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनलची स्थापना केली असल्याचेही त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती राजाराम महाराज या काळातील इतिहास मी ग्रंथरूपाने इंग्रजी–मराठीसह इतर भाषामध्ये प्रकाशित केला आहे. सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय शिवकालीन रणरागिणी निबंध स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. डॉ. अनुज अविनाश केसरकर, मुंबई (प्रथम क्रमांक), प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, ठाणे (द्वितीय क्रमांक), सुमिता अभिषेक पवार, मुंबई (तृतीय क्रमांक ), स्नेहल गोविंद चव्हाण, रत्नागिरी आणि हिमांशू विजय शुक्ल, जळगाव (उत्तेजनार्थ ) यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाला मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष विजय ना कदम, ज्येष्ठ पत्रकार राजन देसाई, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक दिलीप दळवी, रामचंद्र जयस्वाल, राजेंद्र मालुसरे, जयवंत मालुसरे, संजय धामापूरकर, अजय नागवेकर उपस्थित होते. सोहळ्याचे सूत्रसंचालन मराठी साहित्य व कला सेवाचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर, युक्ता गोठणकर आणि आरती लोखंडे यांनी केले. आर्णा सुर्वे, साक्षी निर्मल, गौरव गायकवाड, समिक्षा बिळीगुदरी आणि साहिल धाकतोडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# प्रवीण राम ठाकूर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत पक्षप्रवेश

**उरण । प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील उलवे येथील प्रसिद्ध व्यावसायिक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रविण राम ठाकूर यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अजितदादा पवार गट )मध्ये पक्षप्रवेश केला आहे.उलवे येथील प्रवीण राम ठाकूर यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खासदार तथा मंत्री सुनिल तटकरे,रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून, गीताबाग सुतारवाडी, रोहा तालुका येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची रायगड जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकि दरम्यान जाहिरपणे पक्ष प्रवेश केला.यावेळी महिला व बाल कल्याण मंत्री आदितीताई तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा प्रवक्ते धनंजय देशमुख, जेष्ठ कार्यकर्ते अंकुश खडस,कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, कार्याध्यक्ष सुभाष केकाने,सोशल मीडिया रायगड जिल्हा अध्यक्ष विलास वसंत यादव,उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, उरण तालूका अध्यक्ष परीक्षित ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित प्रमुख मान्यवरांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.प्रविण राम ठाकूर यांनी पक्ष प्रवेश करताच त्यांच्यावर रायगड जिल्हा सरचिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तसे अधिकृत नियुक्ती पत्र त्यांना देण्यात आले. दांडगा जनसंपर्क,अभ्यासू व्यक्तिमत्व, विविध समस्या सोडविण्याचे कौशल्य हे प्रवीण राम ठाकूर यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. आजपर्यंत केलेली विविध विकासकामे, सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची निवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या रायगड जिल्हा सरचिटणीस पदी करण्यात आली. त्यांच्या या नियुक्तीचे सर्वच स्तरातून स्वागत होत असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रवीण राम ठाकूर यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रवीण राम ठाकूर यांची केलेली नियुक्ती महत्वाची मानली जात आहे. प्रवीण राम ठाकूर हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्य व विचार तळागाळात पोहोचविण्यास कटीबद्ध असून त्यांच्या नियुक्ती मुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणण्यात प्रवीण ठाकूर यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या-सुप्रिया सुळे

## राज्यामध्ये काही महिन्यांपासून प्रचंड अस्वस्थता



**पुणे (वृत्तसंस्था)**–गेल्या ४ महिन्यांपासून (१५ मे ते १५ सप्टेंबर) सतत पाऊस पडत आहे. राज्यात अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे मी महाराष्ट्र सरकारला विनंती केली आहे की दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी जो शब्द दिला होता की आमचे सरकार आल्यावर सरसकट कर्जमाफी देऊ हे शब्द पाळावा आणि राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यामध्ये गेल्या काही महिन्यांपासून प्रचंड अस्वस्थता आहे. सरकारने जो जी आर काढला आहे त्यातून नक्की कुणाला आरक्षण मिळाले आहे हे कुणालाच समजत नाहीये. सरकारकडून कन्फ्युजिंग सिग्नल हे सरकार देत आहे, असे सुळे यांनी म्हटले आहे. तर ओला दुष्काळ, राज्याची आर्थिक परिस्थिती असे अनेक विषय राज्यात असल्याची आठवण त्यांनी सत्ताधाऱ्यांना करुण दिली.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांगले प्रेझेंटेशन करावं आणि राज्याला आज आरक्षणाची परिस्थिती काय आहे? सरकारने जो नवीन जी आर काढला आहे त्यांचा किती लोकांना फायदा होणार आहे, झाला आहे, त्यांची संपूर्ण माहिती पारदर्शकपणे राज्यातील जनतेला समजून सांगावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. तर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज वाढदिवस आहे आपण त्यांना मनापासून शुभेच्छा दिल्या पाहिजे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, उद्धव ठाकरेंवर आरोप करणाऱ्या सोबत असलेली मंत्रिमंडळातील अर्धी टीम तर तीच आहे. उद्धव ठाकरेंवर आरोप करणं हे दुर्दैवी आहे. आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा चौकशी लावा ना? उद्धव ठाकरे यांनी कोरोना काळात खूप चांगले काम केले आहे, असे भारत सरकारने म्हटले आहे. ते सरकार भाजपचेच आहे ना? मनपा, जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर अशी टीका करणे अत्यंत दुर्दैवी आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महिनाभरापूर्वी मी गृहमंत्री अमित शहा यांना भेटण्यासाठी गेले होते, यावेळी मी त्यांना विनंती केली होती की महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा. अमित शहा यांच्याकडे दोन खात्यांचा कारभार आहे, एक सहकार आणि दुसरे गृह खाते. अतिवृष्टीच्या काळात एनडीआरएफची टीम मदतीसाठी येते ती गृहमंत्रालयाच्या अखत्यारित असते. तर सरसकट कर्जमाफीची जी आमची मागणी आहे ती सहकार विभागाच्या मार्फत अर्थ मंत्रालयाकडे जात असते अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.

# महंत श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचा जगद्गुरू सेवा भूषण पुरस्काराने गौरव

**केज । प्रतिनिधी**



रामानंद मिशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा जगद्गुरू सेवा भूषण पुरस्कार यावर्षी केज तालुक्यातील श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थानचे संस्थापक अध्यक्ष महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांना प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार सोहळा पुणे येथे अत्यंत उत्साहात व आध्यात्मिक वातावरणात पारपडला. श्री.ह.भ.प.भावार्थ महाराज देखणे विश्वस्त श्री.संतज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती,श्रीक्षेत्र आळंदी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार महंत ह.भ.प.श्री.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांना प्रदान करण्यात आला.समाजप्रबोधन, संतवाङ्मय प्रचार-प्रसार, अध्यात्म व सेवाभावी कार्यातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन हापुरस्कार देण्यात आला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या सोहळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.त्यामध्ये श्री.पं.विशालजी कशाळकर गुरूजी, श्री.पं.रघुनाथजी खंडाळकर,नगरसेवक श्री.युवराज बेलदरे, श्री.आर.के.रांजणे, प्रा.सचिनजी डिंबळे, प्रा.गणेश महाराज भगत,श्री.प्रशांत निगडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी महादेव महाराजांच्यासमाजसेवा,अध्यात्मिक कार्यआणि गुरुकुल परंपरेतील सातत्यपूर्ण योगदानाचे कौतुक केले.

# जिवाची वाडी येथील शिक्षक हनुमंत चौरे यांची बदली झाल्यामुळे निरोप समारंभ संपन्न

**केज । प्रतिनिधी**

दि.१८ सप्टेंबर रोजी केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथील जि.प.प्रा.शाळा एडका वस्ती या शाळेतून हनुमंत चौरे यांची बदली झाली असून त्यांनी दि.१ जुलै २००४ ते दि.१८ सप्टेंबर २०२५ पर्यंत म्हणजे २०-२१ वर्ष या जिल्हा परिषद शाळा एडका वस्ती येथे शैक्षणिक कार्य केले.त्यांनी गावातील एक नागरिक सोडून शिक्षक कसा असावा हे त्यांच्या शिक्षक वृतीतून अनेक वेळी गावकऱ्यांनी अनूभवले आहे.असे शिक्षक प्रत्येक शाळेवर असावेत म्हणजे शिक्षण क्षेत्रातील दर्जा उंचावेल

आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात आवड निर्माण होईल व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी योग्य पाया उभारलेला दिसेल हनुमंत चौरे सर यांच्या निरोप समारंभ नाही तर दु:ख म्हणावे लागेल.कारण शिक्षक काय असतो हे त्यांनी विद्यार्थ्यांना नाही तर तेथील नागरीकांना देखिल त्याची जाणीव करून दिली.आज आम्ही चांगल्या शिक्षकाला निरोप देतोय हे दु:ख आहे पण त्यांनी केलेली कामगिरी हि अतुलनीय आहे.हनुमंत चौरे सर यांनी मुलांना दिलेली शिक्षण रुपी विद्या त्याबद्दल आम्ही तुमचे ऋणी आहोत.


आपले कार्य सदैव विस्मरणीय राहील असे भावनीक उद्गार एडका वस्ती वरील पालकांनी यावेळी व्यक्त केले.



# जि.प.प्रा.शाळा गांजपूर येथे मीना जाधव यांचा विद्यार्थ्यांना भावनिक निरोप

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गांजपूर येथीलशिक्षिका श्रीमती मीना जाधव यांची बदली झाल्याने शाळेत निरोप समारंभ पार पडला.शेवटच्या दिवशी श्रीमती जाधव यांनी आपल्या विद्यार्थ्यांना स्माईल बॉल देत गोड आठवणी दिल्या तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप केले.या अनोख्या पद्धतीने निरोप घेतल्याने विद्यार्थी आनंदित झाले.आपल्या आवडत्या शिक्षिकेचा निरोप घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू होते,परंतु मनामनात भावनिक ओलावा दाटून आला.श्रीमती जाधव यांनी शिक्षक म्हणून केलेल्या कार्याचा विद्यार्थ्यांवर चांगला प्रभाव पडला असून त्यांच्या कार्याची शाळेत कायम आठवण राहील,असे सहकाऱ्यांनी सांगितले.



# तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे माणूसपण हरवले जात आहे-प्रा.डॉ.शैलजा बरूरे

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर हा विकासासाठी आवश्यक आहे.मात्र तंत्रज्ञानाच्या आहारी जाणे धोक्याचे असून तंत्रज्ञानाचा वापर करून उन्माद वाढविला जात आहे.त्यामुळे माणसातला माणूसपणा हरवत चालला आहे असे प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांनी सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना प्रतिपादन केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यप्रकाश रुद्रवार होते. प्रमुख व्याख्यात्या म्हणून प्रसिध्द साहित्यिका प्रा. डॉ.शैलजा बरूरे उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य डॉ.जी. के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन के. मूळे, उपप्राचार्य डॉ.एम.ए. कव्हळे, प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड, प्रा. स्नेहल पाठक याची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतांना प्रा. डॉ. शैलजा बरूरे म्हणाल्या की, जातिवाद एक शाप आहे तो अजून संपलेला नाही. धर्माच्या नावावर उन्माद वाढला आहे. समाजामध्ये जातिवाद, प्रांतवाद, बालविवाह, हुंडाबळी तसेच पर्यावरणाच्या समस्याने समाजाला ग्रासले आहे. आपणास स्वातंत्र्य मिळाले पण आपण मोबाईलच्या आहारी जाऊन स्वातंत्र्य गमावुन बसलो आहोत. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एन.के. मुळे यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. एम ए कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. अशोक दौंडे यांनी मानले.कार्यक्रमाला विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# हजरत ख्वाजा मख्दुम महेमुदशाह अन्सारी (रहे) ऊर्स निमित्त फळ व पाणी वाटप

## सोमनाथ चांदमारे युवा मंच पात्रुड यांचा स्तुत्य उपक्रम

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

तालुक्यातील पात्रुड येथील हजरत ख्वाजा मखदूम महेमुदशाह अन्सारी ( रहे) उर्स हा प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहास प्रारंभ झाला असून येथील संदल, उर्स मध्ये अनेक जाती धर्मातील व पंचक्रोशीतील तसेच दूर दूर होऊन भाविक येत असतात.

या भाविक भक्तांच्या प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सोमनाथ चांदमारे युवा मंच पात्रुड चे सर्वेसर्वा, तसेच पुणे येथील युवा उद्योजक सोमनाथ चांदमारे यांच्यावतीने या यात्रेस येणाऱ्या भाविकांना अल्पोपहाराच्या माध्यमातून केळी, मोसंबी फळे तसेच पाण्याचे वाटप करण्यात आले. दरवर्षी सोमनाथ युवा मंच पात्रुड, येथील पुणे येथे युवा उद्योजक म्हणून ख्याती असणारे सोमनाथ चांदमारे हे हजरत ख्वाजा मख्दुम मेहमूदशाह अन्सारी ( रहे ) यांच्या उरसा निमित्त भाविक भक्तांच्या भोजनासाठी व अल्पोपहाराची सोय राबवत स्तुत्य उपक्रम राबवत असतात. या त्यांच्या निस्वार्थी अन्नदान कार्यक्रमाच्या उपक्रमामुळे पंचक्रोशीतील व बाहेरून येणाऱ्या भाविकांच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला. या उपक्रमामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



# बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनात बीड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रभर एकाच दिवशी आंदोलन करण्यात आले. त्यानुसार बीड जिल्ह्यातही भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले. या आंदोलनात जिल्हाभरातून आलेल्या असंख्य बौद्ध बांधव, समता सैनिक दलाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या आंदोलनात भारतीय बौद्ध महासभेचे राज्यस्तरीय प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यात अमरसिंग ढाका (संरक्षण सचिव, महाराष्ट्र राज्य), महालिंग निकाळजे (अध्यक्ष), कॅप्टन राजाभाऊ आठवले (संरक्षण उपाध्यक्ष), भंते पैयातीस, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अजय सरवदे आदींचा समावेश होता.तसेच जिल्हास्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये पुरुषोत्तम वीर, अनुरत वीर, महिला अध्यक्ष अरुणाताई निसर्गंध, तालुकाध्यक्ष मंदाताई मास्के, प्रतिभाताई वाघमारे, सिद्धार्थ जगझाप, वावळकर, भोले, बनसोडे साहेब, आष्टी तालुका अध्यक्ष रत्नकांत निकाळजे, वामन निकाळजे, गेवराई तालुका अध्यक्ष अनिल बोराडे आदींनी उपस्थित राहून आंदोलनाला ताकद दिली.या मुक्ती आंदोलनामुळे भारतीय बौद्ध महासभेची सामाजिक सक्रियता अधोरेखित झाली असून समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी संघटित लढा उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.




# परळी येथे साप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**परळी । प्रतिनिधी**

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी परळी शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रसिद्ध असणार्या गणेशपार विभागातील साप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळ २०२५ ची कार्यकारनी विशाल भैया देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व परळी नगरीचे माजी नगरअध्यक्ष तथा साप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक नाना देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व माऊली चिकने,



भव्य आसा आकर्षक देखावा सादर करण्यात येणार असून या मध्ये सर्व धर्म समभाव चे देखावे व गुफा सादर करण्यात येणार आहेत लहान मुलांन पासून मोठ्या व्यक्ती पर्यंत सर्वांना पाहण्यासाठी आकर्षक असा देखावा होणार आहे

केशवराव जाधव, राजाभाऊ बारगजे, विजय पुजारी, विजय माळी, बालाजी घोडके, उत्तम मोरे, आबासाहेब देशमुख, प्रकाश चाचा देशमुख, अरुण तापके, राम लोखंडे, नितीन चव्हाण दत्ता काळे, बालाजी अनंतपुरे, पेंटर अनिल, जगन्नाथ सुरवसे, दीपक पूरभय्ये, राजू पूरभय्ये, अनंत देशमुख, पांडू सुरवसे, ओम दादा देशमुख सतीश सानप, मुकुंद देशमुख, सुनील देशमुख, अँड. अर्जुन सोळंके प्रदीप देशमुख, नीलेश देशमुख अरविंद देशमुख या सर्वांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये चिठ्ठी काढून लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठी द्वारे खालील प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली

अध्यक्ष दत्तात्रय तुरुप,उपाध्यक्ष, शुभम मुंडे, लखन ठाकूर,सचिव संग्राम पवार सहसचिव सौदागर शेळके, कोषाध्यक्ष तेजस देशमुख, सहकोषअध्यक्ष गोविंद चाटे, कार्यअध्यक्ष भैय्या मस्के, सजावट प्रमुख संदीप देशमुख, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम चाटे, गणेश पुजारी वरील सर्व पदाधिकारी यांचे दीपक देशमुख यांनी अभिनंदन केले.

# नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील वडाळी येथे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

## स्मशानभूमीपर्यंत जाण्यासाठी नागरिकांची परवड

**वडाळी । लाला चव्हाण**

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील वडाळी गावातील अमरधाम (स्मशानभूमी)पर्यंत जाण्यासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्मशानभूमीसाठी असलेला रामरथ गेल्या वर्षभरापासून टायर फुटलेला असून तो दुरुस्त न केल्याने गावकऱ्यांना मृतदेह खांद्यावर उचलून न्यायची वेळ आली आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. परिणामी, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.एक वर्ष उलटून गेले तरी रामरथ दुरुस्त करण्यात आलेला नाही. गावकऱ्यांचे हाल होत आहेत, तरी कोणी ऐकून घेत नाही, अशी नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली.रामरथमध्ये मृतदेह घेऊन जाताना कोणीही बघू शकतो की टायर फुटलेला असून वाहनाची अवस्था दयनीय झाली आहे.



ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे गावकऱ्यांना मोठ्या अपमानास्पद परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.गावकऱ्यांनी स्मशानभूमीकडे जाण्यासाठी असलेल्या रामरथचे तात्काळ दुरुस्तीकरण करून योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे. मरणानंतरही मृतदेहाला सन्मान मिळाला नाही, ही बाब खेदजनक वडाळी येथील ग्रामपंचायतीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न





**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सय्यद बाशा पीर साहेब दर्गा याठिकाणी माननीय विठ्ठलराव नागरगोजे – गटविकास अधिकारी , पंचायत समिती , केज . यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपण करण्यात आले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सरपंच जनाबाई नरहरी काकडे साबला . प्रमुख पाहुणे माननीय अनिलराव चौरे – विस्तार अधिकारी , पंचायत समिती , केज. माननीय विजयकुमार मस्के – विस्तार अधिकारी , पंचायत समिती , केज . उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे साबला .माननीय तानाजी शिंपले – ग्रामपंचायत अधिकारी साबला , माननीय मधुकरराव काकडे माजी सरपंच साबला . माननीय मोहजेब इनामदार , मुंबई . माननीय महादेवराव कटारे माजी सरपंच साबला .माननीय हनुमंतराव नाईकनवरे माजी सरपंच साबला . माननीय राहुलराव सरवदे रिपाई ( आठवले गट ) जिल्हा उपाध्यक्ष , बीड . माननीय वली तांबोळी प्रकल्प समन्वयक एआरटी संस्था , यवतमाळ . श्रीमती ज्योती सांबरे प्रकल्प सहाय्यक एआरटी संस्था , यवतमाळ . वरील सर्व मान्यवरांच्या हस्ते तसेच साबला नगरीतील नागरिकांच्या उपस्थितीत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली .

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय विठ्ठलराव नागरगोजे – गटविकास अधिकारी , पंचायत समिती , केज . यांनी मार्गदर्शन करत असताना , आपल्या जीवनात वृक्षांचं महत्व काय आहे. तर सावली गार मिळते , स्वच्छ हवा मिळते . वृक्ष लागवड करणे ही सध्या काळाची गरज आहे . तसेच त्यांचे संगोपन ही केले पाहिजे . मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान या अभियानात आपला सहभाग नोंदवावा . त्याच्या माध्यमातून गावातील स्वच्छतेचे . महत्व त्यांनी साबला नगरीतील नागरिकांना समजावून सांगितले . ओला कचरा गोळा करून वेगळा ठेवणे . व सुका कचरा गोळा करून वेगळा ठेवणे . तसेच प्लास्टिकच्या कॅरी बॅग ईतर कुठेही टाकू नये . म्हणजे याच्या पासून डास होणार नाहीत . घाण वास येणार नाही .जशी आपण आपल्या आरोग्याची घेतो . तशी आपण गावातील नागरिकांच्या आरोग्याची सुध्दा घेतली पाहिजे . गावातील सांडपाण्यासाठी शोष खड्डा तयार करणे .त्या पाण्याचा जमिनीत निचरा करणे . आपल्या घराच्या जवळपास घाण न होऊ देणे . अशाप्रकारची कामे करण्यासाठी गावातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा . गावात आरोग्य केंद्र असावे , गावातील तरुण युवकांना तसेच वयोवृद्ध नागरिकांना व्यायाम करण्साठी मोकळे मैदान असावे . गावातील शाळा , अंगणवाडी , यांच्या इमारती मजबूत असायला पाहिजेत . या कार्यक्रमासाठी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यामध्ये नजीर काझी यांनी स्वतः च्या खर्चाने काही वृक्षांची रोपे घेवून दिली आहेत . उपस्थित ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , तसेच गणेश कटारे , महादेव काकडे , बालाजी काकडे , दत्तकुमार काकडे , जालिंदर मुळे , संदिपान काकडे , अभिमान नाईकनवरे , हनुमंत काकडे , अक्षय काकडे , गुलाबराव मुळे , विश्वनाथ नाईकनवरे , लखन राऊत , बाबासाहेब नाकईनवरे , गणेश काकडे , सुदर्शन काकडे , रामहरी काकडे , सिध्देश्वर मुळे , रामेश्वर मुळे , अनिलराव भोसले , महेश काकडे , काशिनाथ काकडे , रंगनाथ काकडे , गोरख काकडे , सौरभ काकडे , राजेश नाकईनवरे , खैरात काझी , खमरोद्दिन काझी , लक्ष्मण महाराज काकडे , नेहाल काझी , अनंत नाकईनवरे , बाबासाहेब काकडे , संदिपान सरवदे , गणेश सरवदे , संतराम सरवदे यावेळी गावातील इत्यादी नागरिक उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण तात्या काकडे यांनी तर प्रास्ताविक आदर्श शिक्षक नरहरी काकडे तर आभार प्रदर्शन विजयकुमार शिंदे केले .

# कन्या विद्यालयात किशोरवयीन अवस्थेतील बदल व एचआयव्ही–एड्सविषयी जनजागृती कार्यक्रम

## आरोग्यदायी भविष्यासाठी ज्ञानाचा प्रकाश

**बोरद । मंगेश पाटील**

गुलाबाबाई दुल्लभ राजकुळे कन्या विद्यालय, तळोदा येथे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई व उपजिल्हा रुग्णालय, तळोदा यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी सौ. राखी पारेख (समुपदेशक, एस.डी.एन . तळोदा) यांनी किशोरवयीन अवस्थेतील भावनिक, शारीरिक व मानसिक बदलांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच एचआयव्ही–एड्सविषयी योग्य समज निर्माण करून समाजातील गैरसमजुती दूर करण्यासाठी माहितीपर चर्चा घेण्यात आली.कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयातील



महिला कर्मचारीवर्ग, विद्यालयातील शिक्षिका व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या उपक्रमामुळे किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्यजागरूकतेची भावना वृद्धिंगत होऊन समाजात सकारात्मक बदल घडविण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन सौ. पारख यांनी केले.महिलांनी महिलांसाठी आयोजित केलेल्या या आरोग्यविषयक स्तुत्य उपक्रमाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष चेतनदादा पवार, उपाध्यक्ष प्रतिभाताई मगरे, संचालिका मेघाताई पवार, समन्वयक निमेश सूर्यवंशी, संचालक महेश मगरे तसेच मुख्याध्यापक श्री. मिलिंद धोदरे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली देवरे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्योती महाजन यांनी मानले.

# १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना: भोई समाज आक्रमक, फास्ट ट्रॅक कोर्टात खटल्याची मागणी

**मोलगी । रवींद्र वळवी**

अकोला जिल्ह्यातील गुलजारपूर येथे एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे भोई समाजात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव शहरात भोई समाज बांधवांनी एकत्र येत जोरदार आंदोलन केले.

समाजाच्या वतीने धडगाव तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले असून, आरोपी तोहित समर याच्यावर फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून पीडितेला तातडीने न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, गुन्हेगाराला कठोर शिक्षा व्हावी जेणेकरून भविष्यात अशा घटनांना आळा बसेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या घटनेमुळे संपूर्ण राज्यात भोई समाजामध्ये संतापाची लाट पसरली आहे.



धडगावातील या निषेध आंदोलनात मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

यावेळी भोई समाजाचे अध्यक्ष अशोक शिवदे, सुरेश साठे, गोपाल शिवदे, माजी नगरसेवक प्रल्हाद तमखाने, सामाजिक कार्यकर्ते दीपक शिवदे, डॉ. किरण निकवाडे, महेंद्र शिवदे, हर्षल रामोळे, रोहित मोरे, सतीश साठे, विशाल मोरे, गौतम मोरे, मनोहर साठे, गोपाल खेडकर, संदीप सूर्यवंशी, संतोष रामोळे, अमोल रामोळे, जगदीश तावडे, राकेश सोनवणे आणि संजय साठे यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

## आदिवासी कुटुंबांसाठी 'आदी कर्मयोगी' अभियान सुरू

# जिल्हा प्रोसेस लॅब (DPL) च्या उद्घाटनाने अभियानाला गती

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दि. १८ सप्टेंबर रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'आदी कर्मयोगी' अभियानांतर्गत जिल्हा प्रोसेस लॅब (ऊझङ) ची सुरुवात करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल आणि अनय नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यातील तालुका मास्टर ट्रेनर्ससाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

केंद्र सरकारची योजना 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' अंतर्गत 'आदी कर्मयोगी' अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश सेवा, समर्पण आणि संकल्प या त्रिसूत्रीच्या आधारे विविध विभागांच्या २५ योजना ७१७ गावांमध्ये प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत पोहोचवणे, २० लाख 'चेंज लीडर्स' तयार करणे आणि शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ सुनिश्चित करणे आहे.



राज्यस्तरावर प्रशिक्षण घेतलेल्या १२ जिल्हा मास्टर ट्रेनर्सनी यापूर्वी एक दिवसीय जिल्हा अभिमुखता कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानंतर आता तीन दिवसीय तालुका मास्टर ट्रेनर्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये वनविभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ग्रामपंचायत, पुरवठा, विद्युत, कृषी, महिला बालविकास, बांधकाम, पाणीपुरवठा, लघु पाटबंधारे, आरोग्य, पशुसंवर्धन, आदिवासी विकास विभाग आणि शिक्षण विभाग यांसारख्या विविध विभागांचे मास्टर ट्रेनर्स उपस्थित होते.या प्रशिक्षणादरम्यान, तालुका मास्टर ट्रेनर्स गावांचे क्लस्टर तयार करून ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करतील. २ ऑक्टोबरपर्यंत ७१७ गावांमध्ये 'सहभागी ग्राम कृती आराखडा' तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानामध्ये प्रत्येक गावामध्ये 'आदी सहयोगी' आणि 'आदी साथी' यांची निवड करून ते यशस्वी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

यावेळी बोलताना अनय नावंदर यांनी सांगितले की, हे अभियान आदिवासी गावांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे. कोणताही व्यक्ती वंचित राहणार नाही, या उद्देशाने काम करणे आणि सहभागी पद्धतीने ग्राम कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. नमन गोयल यांनी सांगितले की, हे अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषदेतील सर्व विभाग एकात्मिक पद्धतीने काम करतील आणि आदिवासी कुटुंबांना प्रत्येक शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करतील. हे अभियान जगातील आणि देशातील सर्वात मोठे अभियान असून, ते 'मिशन मोड'मध्ये पूर्ण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आदिवासी विकास विभागासह इतर सर्व यंत्रणांनी हे काम स्वतःचे समजून सर्व योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यशाळेला नमन गोयल, अनय नावंदर, शिवांश सिंग, जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर्स, आदिवासी विकास विभागाचे सर्व अधिकारी आणि विविध विभागांचे मास्टर ट्रेनर्स उपस्थित होते.

# सुजात आंबेडकर यांच्या भव्य यल्गार महासभेसाठी केज तालुक्यात वंचित बहुजन आघाडीची बैठक संपन्न




**केज । प्रतिनिधी**

परळी येथे येत्या दि.२९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या भव्य येल्गार महासभेच्या पार्श्वभूमीवर केज येथे वंचित बहुजन आघाडी ची महत्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत वंचित बहुजनआघाडीचे महासचिव मिलिंद घाडगे यांच्या अध्यक्षते खाली पार पडली.या बैठकीस उपस्थित धनराज सोनवणे जिल्हा उपाध्यक्ष,जेष्ठ नेते रज्जाक सय्यद, राजेश सरवदे युवक आघाडी तालुकाध्यक्ष, जेष्ठ नेते परमेश्वर लांडगे,आदर्श जंगले युवक आघाडी तालुका उपाध्यक्ष परळी, बाळकृष्ण कसबे,शरद धिवार,जेष्ठनेते लिंबराज गायकवाड,प्रदिप गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत बोलताना महासचिव मिलिंद घाडगे यांनी आवाहन केले की,परळी येथे २९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सुजात दादा आंबेडकर यांच्या भव्य येल्गार महासभेसाठी केज तालुक्यातून बहसंख्येने उपस्थित राहावे.ही केवळ सभा नसून बहुजन समाजाच्या हक्कासाठीचा एक ऐतिहासिक आवाज आहे.यावेळी त्यांनी सांगितले की,सुजात दादा आंबेडकर हे जिल्ह्यात पहिल्यांदाच येत असून,त्यांच्या नेतृत्वातून समाजाला नवा मार्गदर्शन मिळणार आहे.त्यामुळे ही सभा ऐतिहासिक ठरणार आहे.हजारोच्या संख्येने आपण उपस्थित राहून बहुजन ऐक्याची ताकद दाखवावी.केज तालुक्यातील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिकांमध्ये या यल्गार महासभेबद्दल प्रचंड उत्साह पाहायला मिळत असून,दि.२९ सप्टेंबरला परळीत होणारी यल्गार सभा बहुजन समाजाच्या ऐक्यासाठी मोठा टप्पा ठरेल,असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# तळोदा येथे 'सेवा पंधरवाडा' अंतर्गत स्वच्छता मोहीम

**नंदुरबार । दिपक गोसावी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी (ग्रामीण), तळोदा यांच्या वतीने 'सेवा पंधरवाडा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, ग्रामपंचायत रापापूर अंतर्गत हाडंबा गावातील हाडंबा मातेच्या मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेत भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष दरबारसिंग पाडवी यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.



यामध्ये नारायण ठाकरे, दारासिंग वसावे, सरपंच प्रीतिमा वळवी, विक्रम वळवी, हरिचंद्र ठाकरे, विरसिंग पाडवी, चिंतामण पावरा, मांगीलाल पाडवी, चंपालाल वळवी, तुंगा चौधरी, आणि कपिल राहसे यांचा समावेश होता.यावेळी, उपस्थितांनी मंदिर आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर पूर्णपणे स्वच्छ केला. या स्वच्छता मोहिमेमुळे मंदिर परिसराला एक नवा लूक मिळाला आहे. 'सेवा पंधरवाडा' अंतर्गत अशाच प्रकारे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# केज शिवसेना उबाठा टोलनाका संदर्भात रास्तारोको आंदोलन करणार–तालुकाप्रमुख अशोक जाधव

**केज । प्रतिनिधी**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उमरी केज टोलनाका संदर्भात केज तहसील येथे निवेदन देण्यात आले. निवेदनात टोलनाका येथे अपुऱ्या सुविधा असताना अवैध टोल वसुली सुरू आहे. सदरिल टोलनाका येथिल कर्मचारी वाहन धारकांनाअर्वाच्छ,उद्धट व दादागिरीची भाषा वापरत आहेत,महिलां साठी स्वच्छतागृह नाही टोलची संगणकीय प्रक्रिया खुप हळू गतीने असते त्यामुळे अनेक वाहनधारकांना बराच वेळ टोलनाक्यावरच थांबावे लागते. यासंदर्भात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख अशोक जाधव यांनी केज तहसीलदार यांना



टोलनाका संदर्भात कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता टोल नाक्यावरिल शंभर टक्के शासनाच्या नियमांचे व अटीचे पालन होईपर्यंत सदरील टोलनाका बंद करण्यात यावा नसता केज शिवसेनेच्या वतीने तहसील समोर दि.२९ सप्टेंबर रोजी तीव्र स्वरूपाचे रास्तारोको आंदोलन करण्यात येईल असा ईशारा तालुकाप्रमुख अशोक जाधव,शहरप्रमुख तात्या रोडे,उपतालुका प्रमुख तानाजी धस, मारूती गव्हाणे,पप्पू कोल्हे,किशोर घुले, सुधिर जाधव आदिंनी दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077